# प्रभाव शब्द सामर्थ्याचा!

-प्रा. हेमलता जोशी

**भगवान कृष्णाने अर्जुनाला युद्धासाठी सज्ज होऊन युद्धात प्रत्यक्ष लढण्याचाच उपदेश केलेला आहे. विमनस्क स्थितीत असलेल्या अर्जुनाने साम्राज्य आणि भौतिक सुखावर पाणी सोडून त्याचा त्याग करण्याची इच्छा व्यक्त केली आणि 'श्रेयस्' म्हणजे फक्त उच्च दर्जाचे आध्यात्मिक कल्याण मागितले. त्यामध्ये जगाचे कल्याण किंवा आनंद नव्हता तर फक्त त्याच्या स्वत:च्या आत्मकल्याणाची इच्छा होती. कृष्णाने त्या मागणीकडे लक्ष न देता अर्जुनाला फक्त लढण्याचाच उपदेश केला.**

**पा**श्चिमात्य प्रगत देशांचा आणि पौर्वात्य अप्रगत देशांचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन पूर्णपणे वेगळ्या स्वरूपाचा आहे. पाश्चिमात्य देशातील लोक अत्यंत वेगवान आयुष्य जगतात आणि जीवनातील सर्व भौतिक सुखे देणाऱ्या साधनांचा भरपूर उपभोग घेतात. ते भौतिक सुख निर्माण करण्यासाठी, उपभोगण्यासाठी प्रचंड धडपड करतात. याउलट पौर्वात्य देशातील लोक अध्यात्माच्या नावाखाली फक्त नुसत्या गप्पा मारतात. प्रत्यक्ष काम करण्याची कसलीही धडपड करीत नाहीत. त्यामुळे त्यांच्या जीवनात एक प्रकारचा आळशीपणा, निष्क्रियता आलेली दिसते. एका भागात लोकांची मानसिक शांती हरवलेली आहे. त्यांची मानसिक भूक पूर्ण होत नाही. तर दुसऱ्या भागात माणसांची शारीरिक भूक पूर्ण होत नाही. पौर्वात्य देशातील सरकारे त्यांच्या देशातील अन्न, वस्त्र, निवारा यासारख्या प्राथमिक गरजा पूर्ण व्हाव्या म्हणून पाश्चिमात्य देशांकडे मागण्या करीत असतात.

खरेतर आपल्या भारत देशात भरपूर नैसर्गिक संपत्ती आहे. प्रचंड सुपीक जमीन आहे. प्रचंड जलाशय आहेत. भरपूर मनुष्यबळ आहे आणि अत्यंत प्रगत शास्त्रीय ज्ञान आणि संशोधन उपलब्ध आहे. तरी सुद्धा आपल्यावर दैनंदिन जीवनासाठी मदत घेण्याची पाळी का यावी? जर अंतर्मुख होऊन विचार केला तर लक्षात येईल की, अध्यात्माच्या आणि धर्माच्या नावाखाली आपण काम न करणे आणि आळशीपणा यांचा स्वीकार केलेला दिसत आहे.

भगवान कृष्णाने अर्जुनाला युद्धासाठी सज्ज होऊन युद्धात प्रत्यक्ष लढण्याचाच उपदेश केलेला आहे. विमनस्क स्थितीत असलेल्या अर्जुनाने साम्राज्य आणि भौतिक सुखावर पाणी सोडून त्याचा त्याग करण्याची इच्छा व्यक्त केली आणि 'श्रेयस्' म्हणजे फक्त उच्च दर्जाचे आध्यात्मिक कल्याण मागितले. त्यामध्ये जगाचे कल्याण किंवा आनंद नव्हता तर फक्त त्याच्या स्वत:च्या आत्मकल्याणाची इच्छा होती. कृष्णाने त्या मागणीकडे लक्ष न देता अर्जुनाला फक्त लढण्याचाच उपदेश केला. कृष्णाने त्याला उपदेश केला, "तू फक्त तुझे कल्याण मागितलेस. तुझे कुटुंब, तुझे नातेवाईक आणि संपूर्ण समाजाचे कल्याण का नाही मागितलेस?" आता मात्र अर्जुन गोंधळला. आश्चर्यचकित झाला. त्याला हे कळेना की, लढाई करून एखाद्याला आपली आत्मिक उन्नती कशी साधता येईल?

सर्वसाधारणपणे साधकाला दीक्षा एखाद्या मंदिरात, पवित्र नदीच्या काठावर, पर्वताच्या शिखरावर अथवा पवित्र ठिकाणी दिली जाते. पण अर्जुनाला श्रीकृष्णाची दीक्षा कुठे मिळाली? उपदेश कुठे प्राप्त झाला, तर रणांगणावर! धारातीर्थावर! जेव्हा माणूस गाढ झोपेत असतो तेव्हा तो आपोआप नैसर्गिकरित्या 'संन्यास अवस्थेप्रतच' गेलेला असतो. ज्या जगात आपण राहतो ते एक युद्धक्षेत्रच आहे. कसे? जेव्हा आपण एकटे असतो तेव्हा आपल्या मनात इतरांविषयी चांगले आणि वाईट असे दोन्ही विचार येत असतात. तुमचे हृदय हेसुद्धा एक कुरुक्षेत्रच आहे. आपल्या दैनंदिन जीवनामध्ये सुद्धा घरामध्ये पती-पत्नी, मुले-पिता, आई-मुलगी असे संघर्ष होतच असतात. कारण काहीवेळा एकमेकांचे विचार न पटणे, अहंकार असे कोणतेही कारण असू शकते. रागाचे उद्रेक फुटतात. एकमेकांना तोडून बोलले जाते, निंदा केली जाते. हे सर्व होत असताना एक लक्षात घेतले पाहिजे की, या सर्व चांगल्या आणि वाईट विचारांची, शब्दांची स्पंदने 'ईयर' या पंचमहाभूतातील एका महत्त्वाच्या तत्त्वात ताबडतोब आपला ठसा उमटतात. स्थिर होतात. आणि वातावरणात त्यांचे पडसाद उमटत राहतात.

असे म्हणतात की, भगवद्‌गीतेतला श्रीकृष्ण-अर्जुन संवाद ५००० वर्षांपूर्वी घडला. आधुनिक शास्त्रज्ञ असे म्हणतात की, ते ईयरच्या वेगवेगळ्या पातळ्यांवरून आणि आच्छादनांवरून त्या संवादातील प्रत्यक्ष शब्द पुन्हा परत पकडू शकतील. तसेच चांगल्या अथवा वाईट विचारांचे आणि शब्दांचे असते. ते मनात

आल्याबरोबर तिथेच थांबत नाहीत. ते वातावरणात (space) मध्ये फिरत राहतात आणि आपल्याही भोवती फिरत रहातात. यामुळेच कदाचित ऋषी, मुनी गर्दीत न राहता हिमालयातील गुहांचा आश्रय घेत असावेत. पण ते कुठे जातील? शेवटी ते भूतलवार आणि आकाशाखालीच राहतात. ते जरी नद्यांच्या काठी एकांतात गेले तरी विचार आणि शब्दांच्या लहरी वातावरणातून, वाऱ्यातून त्यांच्यापर्यंत निश्चितपणे पोहोचतातच. कोयना खेड्यातील बसलेल्या भूकंपाच्या धक्क्यांच्या लहरी २००० मैलापर्यंत दूर पोहोचल्या होत्या हे सर्वश्रुत आहे. यावरून आपल्या असे लक्षात येते की, आवाज आणि शब्दांचे वातावरणातील प्रेशर किती सामर्थ्यशाली आणि परिणामकारक असते. आपल्या संतमहात्म्यांनी आपल्याला हिमालयात जाण्याचा सल्ला कधीच दिलेला नाही. उलट ते असे म्हणतात की, तुम्ही जिथे असाल तिथेच रहा आणि हिमालयाचे पवित्र, शुद्ध, थंडगार वातावरण तुमच्याभोवती निर्माण करा ।

प्रत्येकी व्यक्ती या विश्वाचा एक भाग असते आणि प्रत्येक व्यक्तीत संपूर्ण विश्व सामावेलेले असते. प्रत्येक व्यक्ती या विश्वाची एक छोटी प्रतिकृतीच असते. आपले मस्तक हे शरीराचे उन्नत शिखरच असते. हे मस्तक म्हणजे आपल्या बुद्धीचे केंद्रच असते. शांत मस्तक आणि समतोल मन एकत्र आले तर हिमालयीन वातावरणाची अनुभूती यायलाच पाहिजे. आपण कृतीशिवाय राहू शकत नाही. आपण अशा शक्तीचा शोध घेतला पाहिजे की, जिच्याशी आपले सूर जुळले पाहिजेत आणि त्या असीम आध्यात्मिक शांतीची अनुभूती आपल्या मिळेल.

पंचमहाभूतातील सर्वात तरल मूलतत्त्व म्हणजे ईयर अथवा स्पेस होय. ईयर तत्त्वाची प्रॉपर्टी (मूलद्रव्य) (मूलघटक) ही आवाज अथवा शब्द आहे. ईयर अथवा आकाश तत्वाचे भेदन शस्त्राने होत नाही. श्रीकृष्णाच्या जवळ कोणतेही शस्त्र नसते. त्याच्या हातात असते ती छोटीशी 'मुरली', पोकळ बांबूपासून बनवलेली मुरली जेव्हा तो वाजवतो तेव्हा त्यातून बाहेर पडणाऱ्या आवाजाने सारे विश्व, प्राणिमय जगत आणि आकाशतत्त्व पूर्ण भरून जाते, भारले जाते. ईयरमध्ये आवाज हा मूल घटक असला तरी इतर पंचमहाभूते (पृथ्वी, जल, तेज, वायू) पण त्यात सामावलेली असतात. श्रुती आणि उपनिषदे असे म्हणतात की, 'ईयर'ची निर्मिती साक्षात् नारायणापासून झालेली आहे.

या पंचमहाभूतांच्या स्वत:च्या शक्ती आहेत. शब्दांमध्ये सुद्धा त्या एकवटलेल्या असतात. त्याशिवाय 'खुद्द' ईयरशक्ती त्यात असते. त्या शक्ती म्हणजे धरून ठेवणे, नियंत्रित करणे. (पृथ्वीतत्त्व), वाहण्याची, समतोल राखण्याची पाण्याची शक्ती, प्रकाश देण्याची, उष्णता निर्माण करण्याची अग्नीशक्ती, वेगाने वाहणे, प्रगती करणे आणि शांत होणे ही वायूशक्ती आणि 'ईयर'ची ज्ञानशक्ती आवाजात आणि शब्दात, अशा त्या एकवटलेल्या असतात!

एकदा एका फर्स्टक्लासच्या डब्यातून स्वामीराम नावाचे महात्मा प्रवास करीत होते. जवळ 'गीता' होती. स्टेशनवर गाडी थांबली आणि एक उच्चभ्रू गृहस्थ फर्स्ट क्लासच्या डब्यात शिरला. स्वामींना पाहून त्याने टीकास्त्र सुरू केले. 'राम राम कृष्ण कृष्ण' असा जप करणारे तुम्ही स्वामी लोक म्हणजे आळशी, काम न करणारे लोक आहात. एखाद्या बांडगुळासारखे समाजाच्या मदतीवर जगता. सारा भारत देश तुमच्यामुळे आळशी आणि निष्क्रिय झाला आहे वगैरे...' स्वामी राम शांत होते. परत त्या माणसाची टीका सुरू झाली.... 'शब्दात काय आहे? मधु मधु, गोड, गोड असे शब्द नुसते उच्चारून पदार्थाची गोडी अनुभवता येते का? मुळीच नाही...!' स्वामींनी काही उत्तर दिले नाही. मग त्या गृहस्थाने स्वामींची गीता सरळ उचलून पाने चाळायला सुरुवात केली... त्याचा राग थोडासा शमला. ही संधी साधून स्वामीराम त्याला उद्देशून म्हणाले, 'काय मूर्ख माणूस आहेस तू? दुसऱ्यांच्या वस्तू हाताळताना, हातात घेताना त्यांची साधी परवानगी घेण्याचा सुद्धा कॉमन सेन्स तुझ्याजवळ नाही!' आता तो गृहस्थ हे ऐकून चमकला. त्याचा संताप झाला. तो उद्धटपणे स्वामींना म्हणाला, "तुम्ही स्वत:ला काय समजता? 'स्वामी' शीर्षकाच्या नावाखाली, शब्दांच्या सहाय्याने लोकांना भुलवता. सारा देश जणू तुमच्या अंगठ्याच्या इशाऱ्यावरच चालतो असा अहंकार बाळगता. काय समजता काय स्वत:ला? मी तुम्हाला थप्पड मारीन. तुमचे सारे दात बाहेर काढीन.."

स्वामी शांतपणे उत्तरले, "काय झाले? तुमचा चेहरा रागाने इतका लाल का झालाय? मी तर तुम्हाला काठीने मारले नाही किंवा तलवार अथवा बंदुकीने धमकावले नाही! तुम्ही एवढे कशासाठी रागावलात?"

तो माणूस म्हणाला, "काय बोलताय? ही काही सभ्य माणसाची बोलण्याची पद्धत नव्हे!"

मग स्वामीराम म्हणाले, "मी तर फक्त शब्द उच्चारले! तुम्ही मघाशी म्हणालात शब्दात ताकद नसते. पुन्हा पुन्हा उच्चार करून अनुभूती मिळत नाही. 'हरीहरी' म्हणून काही घडत नाही. मी फक्त काही शब्द त्यांचा पुनरुच्चार न करताना बोललो तर तुम्ही एवढे रागावलात, संतापलात. काही निवडक शब्दांनी तुम्ही एवढ्या शीघ्र गतीने स्वत:वरचा कंट्रोल गमावलात. गीतेबरोबर असंख्य श्रेष्ठ धार्मिक ग्रंथांमधील शक्तीमान व ज्ञान

देणाऱ्या शब्दांच्या सामर्थ्याने माणसाला उन्नत करण्याचे, श्रेष्ठत्वाला नेण्याचे कार्य घडू शकते. याचे असंख्य दाखले मी तुम्हाला देऊ शकेन. शब्दांचे सामर्थ्य प्रचंड आहे... सकारात्मक आणि नकारात्मक ऊर्जा, बदल घडविण्याचे सुद्धा...! ते संभाषण तिथेच संपले.

जर फक्त काही निवडक शब्दांचा असा परिणाम होतो तर जेव्हा ते पुन:पुन्हा उच्चारले गेले तर त्याचा परिणाम केवढा प्रचंड असेल? ध्वनीशिवाय शब्दाचे उच्चारण होत नसते. स्वर, व्यंजनांशिवाय शब्दाची उत्पत्ती होऊ शकत नाही. शास्त्रज्ञांनी हे सिद्ध केले आहे की 'ध्वनीमध्ये शक्ती, वेग, ऊर्जा, रंग आणि प्रकाश असतो म्हणून 'शब्द' हा अत्यंत सामर्थ्यशाली आहे हे लक्षात घ्यावे. श्रीस्वामीराम १९३६ मध्ये लाहोरला एका कॉन्फरन्सला गेले होते. त्या ठिकाणी एका प्रदर्शनात 'ध्वनी' विषयक प्रयोग करून दाखवण्याचा एक भाग होता. एका काचेच्या चंबूमध्ये स्पिरिटसारखे द्रव्य ठेवलेले दिसत होते. एका पाइपने त्या चंबूला इलेक्ट्रिक करंट जोडलेला होता. त्या पाइपमधून शब्द उच्चारले की, त्या चंबूमधील द्रव्यात रंगांचे बुडबुडे निर्माण होत असत. स्वामीरामांनी 'ओम'चे पुन:पुन्हा उच्चारण केले तर विविध आकाराचे आणि रंगांचे असंख्य बुडबुडे निर्माण झाले. त्यानंतर आणखी दोन माणसांनी पण ओमचा उच्चार केला. त्या तिघांच्या आवाजाने निर्माण झालेल्या बुडबुड्यांचे आकार, रंग, अगदी वेगवेगळ्या प्रकारचे दिसले. असे का घडावे? शब्द तोच होता. याचे कारण म्हणजे प्रत्येकाची उच्चार करण्याची पद्धत त्याच्या इंद्रियांवर, जिभेवर, घशावर अवलंबून होती.

आपले मंत्रशास्त्र आणि ध्वनी-स्पंदनांचे शास्त्र ध्वनीलहरींच्या सामर्थ्यावर पायाभूत आहे. त्या ध्वनीशक्तीवर ते सामर्थ्य अवलंबून आहे. त्याला 'नाद' असे म्हणतात. लोक म्हणतात, ''शब्दात आणि मंत्रात असे काय विशेष आहे?' शब्दात आणि ध्वनीत प्रचंड ताकद आहे. शक्ती आहे. म्हणूनच तीन वेगवेगळ्या लोकांनी उच्चारलेल्या एकाच शब्दाच्या (ओम्) ध्वनीने तीन प्रकारच्या बुडबुड्यांच्या प्रतिक्रिया निर्माण झाल्या.

भारतीय तत्त्वज्ञानाच्या सहा शाखा आहेत. सांख्य, योग, न्याय, वैशेषिक, पूर्वमीमांसा आणि वेदांत! त्यापैकी पूर्वमीमांसेने 'शब्द'त केवढे सामर्थ्य एकवटलेले असते याचे स्पष्टीकरण, विवरण केले आहे. तर पाश्चिमात्य देशातील शास्त्रज्ञांनी असंख्य प्रयोग केलेले आहेत. ध्वनीच्या लहरींच्या सामर्थ्याने फळ्यावर (Blackboard) विशिष्ट आकृत्या अथवा आकार निर्माण होतात हे सिद्ध केलेले आहे. माणसाच्या शरीरात पण काही इलेक्ट्रिसिटी आणि चुंबकीय शक्ती असते. इलेक्ट्रिक करंट जोडलेल्या खुर्चीवर बसून एका पाश्चिमात्य स्त्रीने प्रेमगीत म्हणायला सुरुवात केली. तशाच प्रकारचे 'ग्राफिक' चित्र ब्लॅकबोर्डवर तयार झाले.

भारतात ज्याची मूलभूत सुरुवात झाली असे The science of Theosophy हे ध्वनीलहरींच्या पायावर आधारलेले आहे. इंजिनिअरिंग कॉलेजच्या एका विद्यार्थ्याला एका विशिष्ट प्रकारच्या खुर्चीवर बसून गाणे म्हणण्यास सांगण्यात आले. पण तो म्हणाला की, ''लहानपणापासून आमच्या घरात वैदिक परंपरा असल्याने वडील आणि आजोबांच्या सहवासात राहून मी गाण्याऐवजी शंकराच्या पूजेच्या वेळी जे मंत्र म्हटले जातात ते म्हणतो.'' त्याप्रमाणे मंत्रपठण सुरू केल्यानंतर, शिवस्तुती युक्त शब्दांच्या उच्चारणामुळे फळ्यावर भगवान शंकराची प्रतिमा त्यांच्या त्रिशूल, डमरू, वाघाच्या कातड्याच्या वस्त्रासह उमटली! जर एखाद्याला व्यवस्थित आणि बिनचूक शब्दांचे उच्चारण करता आले आणि शब्दांच्या अर्थासह ते उच्चारण झाले तर त्या व्यक्तीच्या हृदयात तर ती प्रतिमा उमटतेच; पण फळ्यावर सुद्धा ते चित्र उमटू शकते इतकी प्रचंड ताकद त्या उच्चारणात असते!

आता पुढचा प्रश्न असा आहे की तुम्हाला काय पाहिजे आहे? कोणती प्रतिमा अथवा आकार तुम्ही काढू इच्छिता? उदा. ''उत्तर जर शांती, समाधान आणि आनंद'' असेल तर असे शब्द आणि मंत्र अस्तित्वात आहेत का? उदाहरणार्थ- **ॐ नमो भगवते वासुदेवाय, ॐ क्लीम् कृष्णाय नमः, रामाय नमः''** यासारख्या मंत्रांच्या उच्चारणाने वरील प्रकारची अनुभूती मिळते. तसेच काही बीजमंत्र पण असतात. ते जर योग्य हेतू मनात ठेवून पुन:पुन्हा उच्चारले गेले तर त्या बीजमंत्राची स्पंदने उच्चारण करणाऱ्याच्या अंतर्मनात जातात. त्याचा परिणाम त्या व्यक्तीच्या चेहऱ्यावर दिसायला लागतो. एक प्रकारचे तेज, चैतन्य त्या चेहऱ्यावर निर्माण होते. त्या मंत्राच्या उच्चारणाने बाहेरच्या वातावरणावरही परिणाम व्हायला लागतो. कारण त्या ठिकाणी विद्युतशक्तीची प्रक्रिया (Electrification process) सुरू झालेली दिसते. ती विद्युतशक्ती आत आणि बाहेर खेळायला लागते.

संत मिरेच्या बाबतीत असे म्हटले जाते की ''तिच्यावर अनेकवेळा शस्त्रांचे आघात करून तिला ठार मारण्याचे प्रयत्न झाले. पण भगवान श्रीकृष्णाने तिला वाचवले. सुरक्षित ठेवले.'' याचा नेमका अर्थ काय? हा चमत्कार होता काय? यामध्ये सुद्धा एक शास्त्र दडलेले आहे. आता पाश्चिमात्य देशातील शास्त्रज्ञांना सुद्धा ते पटलेले आहे. एक गोष्ट लक्षात घेऊया... मीरा सातत्याने कृष्णाच्या नावाचा जप करीत असे. हा 'अजपाजप' अखंड चालू असे. तिच्या प्रत्येक श्वासात, कृतीत 'कृष्ण कृष्ण कृष्ण...' हेच नाम स्पंदित होत असे. याचा परिणाम असा झाला की, त्या उच्चारणातून एक प्रकारची विद्युतशक्ती निर्माण झाली. त्यातून

संरक्षण करणारी शक्तीदायक स्पंदने निर्माण होऊन तिच्या शरीराभोवती एक प्रकारचे संरक्षक कवच तयार झाले. त्यामुळेच कोणत्याही तीव्र स्वरूपाच्या जीव घेणाऱ्या शस्त्राचा तिच्या शरीरावर परिणाम झाला नाही. त्या शस्त्रांच्या आघातांचा या संरक्षक कवचामुळे तिच्यावर परिणाम झाला नाही. ती शस्त्रे तिला मारु शकली नाहीत.

जर तुम्ही धातूविषयक शब्दांचा उच्चार केला तर त्यात त्या धातूची मूलतत्त्वे निर्माण होतील. जर तो शब्द पृथ्वीशी संबंधी असेल तर त्यातून सोने किंवा लोखंडाचे चित्र तयार होईल. त्यामध्ये एक प्रकारचे जडत्व, स्थिरता असेल. जलाशी संबंधित असलेल्या शब्दांच्या पुनरुच्चाराबरोबर जलविषयक घटक तयार होतील. तसेच अग्नी आणि वायूतत्वाविषयी म्हणता येईल. ईयर तत्त्वाचा मूळ घटक म्हणजे 'पारदर्शकता' (transperancy) ! ती दिसत नाही पण ती अस्तित्वात असते. त्यांच्या स्पंदनामुळे माणसाच्या भोवती संरक्षक कवच निर्माण होते. ज्या शब्दांमध्ये 'ईयर' या तत्त्वाचे अस्तित्व असते, अशा शब्दांचा अथवा मंत्रांचा उच्चार सातत्याने श्रद्धा व भक्तीने केला तर त्याला कोणतेही शस्त्र अथवा संकट नष्ट करू शकत नाही. **'ॐ क्लीम् कृष्णाय नमः'** या मंत्रामध्ये 'ईयर'चे सामर्थ्य आहे.

संत मीरा कोणतीही गोष्ट कृष्णाला अर्पण केल्याशिवाय खात नसे अथवा पीत नसे. ती कृष्ण भक्तीप्रेमात एवढी दंग असे की, बाह्य गोष्टींचे तिला भानच नसे. त्यामुळे राणाजींकडून 'विषाचा प्याला' आल्यावर तिला ते कळलेच नाही. तिने आपल्या प्रिय कृष्णाला प्रथम तो नेहमीच्या सवयीने दिला आणि कृष्णानेही त्याचा स्वीकार केला. उरलेले द्रव्य मिरेने प्रसाद म्हणून घेतल्यानंतर तिच्यावर कसलाच परिणाम झाला नाही. ती जिवंतच राहिली. हे का घडले? **'कृष्ण'** या शब्दात शस्त्रापासून संरक्षण करणारे, धातूपासून संरक्षण करणारे मूलतत्व स्थित असते. त्यामुळेच आकाशाचे अथवा ईयरचे अॅटमच्या बॉम्बस्फोटानेसुद्धा तुकडे होत नाहीत व हे आपल्याला माहीत आहे. ईयरची उत्पत्ती भगवान श्रीनारायणापासून झाली असल्याने 'नारायणाच्या' सर्व प्रॉपर्टीज मिरेमध्ये आपोआप आल्या. भगवंताचे नाम तिने श्रद्धेने व प्रेमाने पुनःपुन्हा घेतल्यामुळे अमरत्व, निर्भयता, अविनाश अशा सर्व सर्वश्रेष्ठ शक्ती मिरेमध्ये उमटल्या. ती म्हणजे साक्षात् नारायणाचा अंशच झाली! हे एवढे सामर्थ्य केवळ 'नामस्मरण आणि नामपठणाने' निर्माण झाले!

आपण जागृतावस्थेत, निद्रेत, काम करताना सातत्याने ईश्वराच्या नामाचा जप करू शकतो. त्याची फक्त आठवण सातत्याने ठेवा. आपण आपल्या स्वतःच्या नावाचा जप करीत नाही पण म्हणून ते नाव आपण विसरत नाही. काम करताना श्वास चालू असतो. प्राणशक्तीमुळे सर्व हालचाली होतात. हा 'प्राण' कोण निर्माण करतो? या प्राणामागील ती सर्वश्रेष्ठ ईश्वरशक्ती, तिचीच प्रेरणा असते. मग त्या ईश्वरी शक्तीचे सातत्याने स्मरण जपाच्या रूपाने, आठवणींच्या रूपाने करून कितीतरी सकारात्मक, प्रेरणादायक, स्फूर्तीदायक सामर्थ्य आपण मिळवू शकतो!

त्या मंत्रांचे उच्चारण यांत्रिक पद्धतीने न करता श्रद्धा, प्रेम आणि भक्तीने केले तर त्याचा प्रभाव अनेक पटीने वाढतो असा अनुभव आहे. तुमचा कामाचा वेग वाढतो. कौशल्य वाढते- "ईश्वराची प्रतिमा उमटेल का नाही? तो दिसत नाही मग तो मला कसा वाचवेल?" अशा शंका निरर्थक आहेत. फक्त श्रद्धा ठेवा. श्रद्धेने पर्वत हालतात! स्त्रियांनी स्वयंपाक करताना मसाल्याबरोबर ईश्वराच्या नामस्मरणाचा उच्चाराचा मसाला त्यात वापरावा आणि बघावे त्या अन्नाला कशी रुची येते! ईश्वरी प्रेमाच्या जाणीवेने तुमची प्रत्येक कृती घडली तर तुमची आध्यात्मिक शक्ती, शांती आणि ऐश्वर्य कोणीही नष्ट करू शकणार नाही. हिरावून घेणार नाही.

म्हणूनच शब्दसामर्थ्य, ध्वनीसामर्थ्य किती अफाट आहे हे एकदा कळले की, आपोआप माणसाला त्याचा वापर करण्याची प्रेरणा व बुद्धी मिळेल, असा दृढ विश्वास वाटतो. ब्रह्मदेवाच्या 'ओम', प्रणवाच्या उच्चारणाने विश्वाची निर्मिती झाली. मग आपल्याही जीवनात एक शांतीचे, आनंदाचे सुंदर विश्व या शब्दसामर्थ्याने निर्माण होणार नाही?

कठोपनिषदात म्हटल्याप्रमाणे,

***"एतद्ध्येवाक्षरं ब्रह्म एतद्ध्येवाक्षरं परम् ।***
***एतद्ध्येवाक्षरं ज्ञात्वा यो यदिच्छति तस्यतत् ।।"***

हा अविनाशी प्रणव म्हणजे ॐकार आहे. हे परमात्म्याचे निविशेष स्वरूप आहे. ब्रह्म आणि परब्रह्म (जीवात्मा आणि परमात्मा) या दोघांचेही नाव ॐकारण आहे. या तत्त्वाला समजून साधक कोणत्याही अभीष्ट रूपाला प्राप्त करू शकतो.

संदर्भ- Swami Ram- Talks and conversations

**प्रा. हेमलता जोशी**
फ्लॅट नं. १०, राजमयूर सोसायटी (२)
ए/३, एरंडवणे, पर्सिस्टंटच्या मागे, कर्वे रोड,
पुणे ४११००४
दूरध्वनी : (०२०) २५४४०५७६